# ॥ज्योतिर्मय॥

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ६१ वा ❑ गुरूवार दि.१० एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## तामिळनाडूमध्ये राज्यपालपदावरून राजकारण तापले

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

राज्य विधानसभेत मंजूर झालेल्या १० विधेयकांना मान्यता न दिल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडूचे राज्यपाल आर एन रवी यांना कडक शब्दांत फटकारले आहे. आता राज्यात त्यांची हकालपट्टी आणि राजीनामा देण्याची मागणी तीव्र झाली आहे. विविध राजकीय पक्षांनी न्यायालयाच्या निर्णयाचे वर्णन ऐतिहासिक केले आहे. काँग्रेस, व्हीसीके, मारुमलारची द्रविड मुन्नेत्र कळघम, डावे पक्ष आणि इतर मित्रपक्षांसह सत्ताधारी द्रमुकच्या नेत्यांनी राज्यपालांच्या कृतीला माफ करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे कौतुक केले. तसेच, त्यांनी तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रमुक अध्यक्ष एमके स्टॅलिन यांनी या संदर्भात उचललेल्या पावलांचे कौतुक केले.

सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्यासमोर प्रलंबित असलेल्या सर्व विधेयकांना त्यांची संमती मिळाल्याचा निर्णय दिल्याने राज्यपालांनी आता पदावर राहू नये, असे राजकीय पक्षांनी म्हटले आहे. राज्यपालांना परत बोलावावे, पदावरून काढून टाकावे किंवा त्यांनी पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी त्यांनी केली. पीएमके आणि अभिनेता विजयच्या टीव्हीकेच्या नेत्यांनीही सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे कौतुक केले. तसेच, राज्य स्वायत्तता आणि संघराज्यासाठी हा एक ऐतिहासिक विजय असल्याचे वर्णन केले आहे.

**मिठाई वाटून निर्णय साजरा**

द्रमुक कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आणि मिठाई वाटून या निर्णयाचा आनंद साजरा केला. सरकारी सूत्रांनी असे सूचित केले की सर्वोच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या विधेयकांना राजपत्रात अधिसूचित करण्याची प्रक्रिया लवकरच सुरू केली जाईल. द्रमुक नेते आर.एस. भारती म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार राज्यपाल रवी आता सरकारी विद्यापीठांचे कुलगुरू नाहीत. राज्यपालांवर निशाणा साधताना भारती म्हणाल्या की, जर ते आज रात्री राजभवनातून बाहेर पडले तर असे गृहीत धरता येईल की ते एक स्वाभिमानी व्यक्ती आहेत, कारण स्वातंत्र्यानंतर गेल्या ७ दशकांत न्यायालयाने कोणत्याही राज्यपालांविरुद्ध असा निर्णय दिलेला नाही. द्रमुक नेत्याने आरोप केला की विधेयके मंजूर न करून, रवी यांनी विरोधी पक्षापेक्षा अधिक विरोधी भूमिका बजावली आहे आणि शत्रूसारखे वागले आहे.

न्यायालयाच्या या कडक टिप्पणीमागील कारणे स्पष्ट आहेत. गेल्या काही वर्षांत, केवळ तामिळनाडूमध्येच नाही, तर केंद्रात विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या अनेक राज्यांमध्ये, राज्यपाल अनेकदा मुख्यमंत्र्यांशी पक्षाच्या कार्यकर्त्याप्रमाणे भांडताना दिसले आहेत.

# उच्च शिक्षण हा विकासाचा पासपोर्ट-डॉ.सुधीर गव्हाणे

## गुणवत्ता वाढीसाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज

ज्योतिर्मय साहित्य

**नांदेड** – उच्च शिक्षण हा विकासाचा पासपोर्ट आहे. त्याचा विस्तार झालेला असला तरी गुणवत्ता वाढलेली नाही. त्यासाठी आपल्या सर्वांना जागरूक राहून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आग्रह धरून प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.सुधीर गव्हाणे यांनी केले. ज्ञानदीप शिक्षण व संशोधन प्रतिष्ठान नांदेडच्या वतीने पीपल्स कॉलेजच्या नरहर कुरुंदकर सभागृहात प्रा. डॉ. डी.एन. मोरे लिखित उच्च शिक्षण धोरण : आव्हाने आणि दिशा या ग्रंथावर आयोजित परिसंवादात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी माजी खासदार आणि नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सचिव सौ. श्यामल पत्की, प्राचार्य डॉ. गणेशचंद्र शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्र चव्हाण, डॉ. सूर्यकांत जोगदंड, नारायण चौधरी, प्राचार्य डॉ. आर.एम. जाधव, प्राचार्य डॉ. श्रीमती कुसुम मोरे, सौ. सुनीता मोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.गव्हाणे म्हणाले की, सरकार शिक्षण क्षेत्रातून काढता पाय घेण्याची भूमिका घेत आहे. शिक्षण खाजगी क्षेत्राच्या ताब्यात देण्याची भूमिका घेत आहे. पण खासगी व सरकारी या दोन्ही शाळा सुरू राहायला हव्यात. त्यांच्यात निकोप स्पर्धा असावी. त्यातून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळायला हवे.



यातून देशाचा आणि राज्याचा विकास होईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० हे अत्यंत प्रभावी आहे, पण त्याची प्रभावी अमंलबजावणी होताना दिसून येत नाही. त्यात जीडीपीच्या ६ टक्के आर्थिक तरतूद करावी लागते, ती केलेली दिसून येत नाही. पुरेसा शिक्षक वर्ग नेमावा लागत असतो, शाळांमध्ये उत्तम प्रकारच्या सोयी-सुविधा असणे गरजेचे आहे. ग्रंथालये असावी लागतात. पण दुर्दैवाने अशी व्यवस्था आपल्याकडील हजारो शाळांमध्ये असल्याचे दिसत नाही.

नवीन शैक्षणिक धोरण तळागाळापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.आरोग्य व शिक्षण या दोन विषयांवर जास्त लक्ष देण्याची गरज आहे. उत्तम दर्जाच्या सुविधा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणीबाबत योग्य ते प्रशिक्षण न दिले गेल्याने प्राध्यापक वर्ग संभ्रमात आहे. सरकारने या प्रकरणी योग्य पाठबळ दिले तर हे उत्तम प्रकारे राबवले जाऊ शकते. समाजातील सर्व घटकांनी देखील आपली जबाबदारी ओळखून हे काम हाती घेतले पाहिजे. या पार्श्वभूमीवर डॉ.डी.एन.मोरे यांनी आपल्या इंग्रजी विषयाच्या पलीकडे जाऊन उच्च शिक्षणात विशेष रस घेवून लिहिलेले पुस्तक म्हणजे मराठीतला सर्वांत उत्तम ग्रंथ आहे. त्यात विचारांची स्पष्टता, अभ्यासाची सखोलता आणि गुणवत्तेची मौलिकता आहे. डॉ.मोरे हे अभ्यासूपणे सातत्याने या विषयावर लिहित आले असून १५० व्याख्याने देखील दिलेली आहेत. एक ग्रंथ म्हणून १२ विषयांची केलेलो मांडणी आणि चिकित्सा करण्याची वृत्ती अभिनंदनीय असल्याचेही डॉ. गव्हाणे यांनी यावेळी सांगितले.

खरेतर शिक्षणाच्या माध्यमातून पुढच्या समाजाची बांधणी आणि विकास होत असतो. यामुळे शिक्षणातील गुंतवणूक ही अधिक फलदायी असते. हे जागतिक पातळीवरही सिद्ध झाले आहे. मात्र आपल्या देशात ते गांभीर्याने होत नसल्याने या सर्व गोष्टींचा बळी विद्यार्थी ठरत आहे. यामुळे विद्यार्थी, राज्य व पर्यायाने देशाचे नुकसान होत आहे. सरकारने प्राध्यापकांची आणि शिक्षकांची रिक्त पदे भरण्याची गरज आहे. यासह ग्रामीण भागातील शाळा, महाविद्यालयाची गुणवत्ता वाढविण्यासाठी सरकारने प्रयत्न करायला हवेत. ज्या शाळांचे उत्पन्नाचे स्त्रोत सक्षम नाहीत, त्यांना मदत करण्याची जबाबदारी सरकारची आहे. पण कोणतेही सरकार असो त्यांची वक्रदृष्टी ही नेहमी शिक्षणाकडेच असल्याचे दिसून येते. शिक्षण हे त्यांच्या दृष्टीने प्राधान्य क्रमाकांचा विषय नाही अशी खंतही डॉ. गव्हाणे यांनी व्यक्त केली. कुलगुरू डॉ. चासकर यांनी नवीन शैक्षणिक धोरण सर्वांनी प्रभावीपणे राबवावे. त्यासाठी विद्यापीठ सर्वतोपरी सहकार्य करील असे सांगितले. डॉ. व्यंकटेश काब्दे यांनी अध्यक्षीय समारोप केला. डॉ. मोरे यांनी प्रस्ताविकातून आपला पुस्तक लेखन प्रवास सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.संदीप काळे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. संगीता अवचार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. दत्ता सावंत, डॉ. तुकाराम हापगुंडे, डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. बाजीराव वडवळे, प्रा. संदीप गायकवाड, डॉ. मुकुंद कवडे, डॉ. दत्ता यादव यांनी परिश्रम घेतले.

यावेळी माजी आ.गंगाधर पटने, जगदीश कदम,प्रा.बालाजी कोम्पलवार, दीपनाथ पत्की, उपप्राचार्य डॉ अशोक सिद्धेवाड, नवनिहालसिंग जागीरदार, प्रा.डॉ.दिलीप चव्हाण, डॉ. मा.मा. जाधव, प्राचार्य डॉ कणसे, डॉ. विना पाटील, प्राचार्य अशोक गवते, प्राचार्य डॉ. कामळजकर, प्राचार्य करुणा देशमुख आदींची उपस्थिती होती.

# प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत 'विश्व नवकार महामंत्र दिवसाचे आयोजन'; विश्वकल्याणासाठी नवसुत्री अंगीकारण्याचे प्रधानमंत्र्यांचे आवाहन

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** – 'विश्व नवकार महामंत्र' दिनाचे औचित्य साधून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत विज्ञान भवन नवी दिल्ली येथे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जगातील अनेक देशात आयोजित या कार्यक्रमाला प्रधानमंत्री यांनी यावेळी संबोधित केले. तर, मुंबई येथे 'विश्व नवकार महामंत्र दिन' महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत एनएससीआय डोम वरळी, मुंबई येथे सामूहिक मंत्रजपाच्या माध्यमातून साजरा करण्यात आला.

आपल्या भाषणातून प्रधानमंत्री यांनी देशवासियांना नऊ संकल्प करण्याचे आवाहन केले. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवा, आईच्या नावाने एक वृक्ष लावा, स्वच्छता पाळा, स्थानिक उत्पादनांचा अधिकाधिक वापर करा, देशातील विविध प्रेक्षणीय स्थळांना भेटी द्यावी, सेंद्रिय शेतीला चालना द्यावी, निरामय जीवनशैली अंगीकारावी, श्रीअन्नाचा अधिक वापर करावा, योग आणि क्रीडा यांना जीवनात स्थान द्यावे तसेच गोर-गरिबांना मदत करावी, असे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केले.

मुंबईत आयोजित कार्यक्रमामध्ये बोलताना राज्यपाल राधाकृष्णन यांनी नवकार महामंत्र हा केवळ शब्द



अक्षरांचा समूह नसून तो अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय आणि सर्व साधू आदी ज्ञानी आत्म्यांचा सन्मान करणारा प्रभावी मंत्र असल्याचे सांगितले. नवकार महामंत्र दिनानिमित्त प्रतिक्रियेपेक्षा चिंतनाला, मतभेदापेक्षा एकतेला आणि संघर्षपेक्षा शांततेला महत्व देण्याचे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.

मुंबईतील कार्यक्रमाला कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, गच्छाधीपती नित्यानंद सुरी, आचार्य के. सी. महाराज, आचार्य नय पद्मसागरजी महाराज, मुनी विनम्र सागरजी, आचार्य डॉ. लोकेश मुनी, अखिल भारतीय भिक्खू संघाचे अध्यक्ष भदंत राहुल बोधी महाथेरो, जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जिटो) चे पदाधिकारी, जैन समाजाचे प्रतिनिधीआदी उपस्थित होते. विश्व नवकार महामंत्र दिनाचे आयोजन जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन 'जिटो' या संस्थेतर्फे करण्यात आले होते.

## लक्षवेधी छायाचित्र....




प्रतिबिंब.....

(छाया : संजय दारमवार, मुंबई)

## मोतीबाग येथे भव्य रक्तदान शिबिर

ज्योतिर्मय साहित्य



**पुणे** – भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त भारतीय संस्कृती संवर्धक संस्था व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मोतीबाग नगर,कसबा भाग यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दिनांक १४ एप्रिल रोजी संस्थेच्या शनिवार पेठ येथील मोतीबाग कार्यालयामध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

१४ एप्रिल रोजी रक्तदान शिबिर आयोजनाचे यंदाचे हे ९ वे वर्ष असून जनकल्याण रक्तपेढी यांचे सहकार्य लाभणार आहे.

१४ एप्रिल रोजी सकाळी ९ ते १ या वेळेत हे रक्तदान शिबिर होणार असून या शिबिराचे उद्घाटन सकाळी नऊ वाजता ''ज्ञानदीप अकॅडमी'' चे संचालक महेश शिंदे ह्यांचे हस्ते होणार असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कसबा भागाचे कार्यवाह राहुल पुंडे यांची मुख्य उपस्थिती असणार आहे.

तरी जास्तीत जास्त जणांनी या शिबिरामध्ये रक्तदान करावे असे आवाहन रक्तदान शिबिर संयोजक सागर दरेकर व भारतीय संस्कृती संवर्धक संस्थेचे अध्यक्ष राजीव जोशी, कार्यवाह प्रसाद खेडकर यांनी केले आहे.

रक्तदात्यांनी अधिक माहितीसाठी व नांव नोंदणीसाठी मयंक ९०९६७२५२६२ किंवा सागर ७०२८१४२३८८ यांचेशी संपर्क करावा


॥ 9 वे पुण्यस्मरण ॥



आठवण येते त्या प्रेमाची
जे प्रेम तुमच्या प्रत्येक ओरडण्यामागे होते,
आठवण येते त्या प्रत्येक क्षणाची
जे क्षण तुमच्या सहवासात घालवलेले होते
तुमचं हसणं सर्व काही होतं
आयुष्यातील ते सुंदर पर्व होतं
आज सर्व काही असल्याची जाणीव होते
पण तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे.

स्मृतीस विनम्र अभिवादन!

कालकथित
भीमराव सांडूजी साबळे
(जन्म दि. १६/०१/१९४४, मृत्यू दि. १०/०४/२०१६)

गव्हर्नमेंट प्रेस, रेल्वे स्टेशन येथे मशीन ऑपरेटर म्हणून सेवानिवृत्त झाले. मॉडर्न संगणक शिक्षण संस्थेचे ते सचिव म्हणून काम पाहत होते. नागसेन मा. औद्योगिक सह. संस्थेचे ते उपाध्यक्ष होते. सामाजिक व धार्मिक कार्यक्रमात सहभागी राहत असत.

शोकाकुल

आयु. सौ. छाया दादासाहेब साबळे (सून-मुलगा), आयु. सौ. संगीता हिरालाल साबळे (सून-मुलगा)
आयु. सौ. रेखा महादेव साबळे (सून-मुलगा), आयु. सौ. मीना साहेबराव जाधव (मुलगी-जावई)
आयु. सौ. रंजना सुखदेव पगारे (मुलगी-जावई), आयु. श्रीमती अंजली भाऊसाहेब भुईगड (मुलगी-जावई)
प्रथमेश दादासाहेब साबळे, प्रतीक दादासाहेब साबळे, सरणम महादेव साबळे, मानस महादेव साबळे (नातू)

उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर मो. ९३७०१२३५४३, ८८०५१११५१५






– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com


आनंदी पहाट...


## संस्कृती संस्कारांवर आधारलेली असते

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

संस्कारांशिवाय जीवन भरकटलेल्या जहाजाप्रमाणे, विमानाप्रमाणे असते, एकप्रकारे विमनस्क अवस्थेतील मन कोणतीही पातळी गाठू शकते. आपली संस्कृतीसुद्धा संस्कारांवर आधारित असते. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असे म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्गुण असणे जरुरीचे असते. अशा गुणांचा केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो. विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतेच असे नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचेच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचे दिसून येत असते. ह्याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक असते. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे, असा विचार आपल्या मनात यायला हवा. विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसे मिळेल, ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणे महत्वाचे ठरते. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक, मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा, आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झाले, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचे दर्शन होतच राहते. आपल्या अंतर्मनाला संस्कारच शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचारांची व्याप्ती आपण समजून घेणे सर्वप्रथम जरुरीचे असते. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याशिवाय आपल्या विचारांमध्ये परिपक्वता येतेच असे नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असते. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात. आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो.

## आनंदाची गुढी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**




गुढीपाडवा हा सण देशाच्या सगळ्या भागात साजरा होतो. दक्षिण भारतात त्याला युगादी किंवा उगादी असे म्हटले जाते. काही ठिकाणी पाडो किंवा पाडवा असेही म्हटले जाते. गुढीपाडवा हा सण आजचा नाही. असे ,म्हणतात की ब्रह्माने याच दिवशी सृष्टी निर्मिली. गुढीपाडव्याचे संदर्भ हजारो वर्षांपासूनच्या वाङ्मयात आपल्याला मिळतात. अगदी रामायणापासून त्यांची सुरुवात होते. गुढी या शब्दाचा अर्थ तामिळ भाषेत लाकूड किंवा काठी असा होत असला आणि प्राचीन मराठी वाङ्मयात गुढी या शब्दाचा झोपडी, कुटी वगैरे असा असला तरी खरं म्हणजे गुढी हा शब्दच आनंदासाठी आला आहे. एखादं मोठं काम करणं, शत्रूवर विजय प्राप्त करणं, हाती घेतलेल्या कामात यश मिळणं या सगळ्या गोष्टींसाठी गुढी उभारणे असा वाक्प्रयोग केला जायचा. माधवदासांनी लिहिलेल्या उत्कट साधूनि शिळा सेतू बांधुनी... या श्रीरामांच्या मराठी आरतीत पुढील ओळी किती सुंदर आहेत बघा –




प्रथम सीताशुद्धी हनुमंत गेला ।
लंकादहन करुनी अखया मारिला ।।
मारिला जंबू माळी, भुवनी राहाटीला
।
आनंदाची गुढी घेऊनिया आला ।।

श्रीरामांनी रावणाचा वध केल्यानंतर म्हणजेच एक अलौकिक असे कार्य संपन्न केल्यानंतर हनुमंत आनंदाची गुढी घेऊन आला. इथे गुढी म्हणजे विजयपताका असा अर्थ घेता येईल. अयोध्येच्या नगरजनांनी सडे शिंपून, रांगोळ्या काढून आणि गुढया तोरणे उभारून श्रीरामांचे स्वागत केले. श्रीकृष्णाने कंसाचा वध केला तेव्हाही नगर वासियांनी श्रीकृष्णाचे असेच स्वागत केले होते असे म्हणतात. महाभारताच्या आदिपर्वात गुढीचा उल्लेख आढळतो. खरं तर असाही अर्थ घेता येईल की आपला देह हीच एक नगरी आहे. आपल्या हृदयमंदिरात आपण आनंदाची गुढी उभारून श्रीराम, श्रीकृष्ण यांचे स्वागत करतो. त्यासाठी हृदयाचे दरवाजे उघडे हवेत. आपल्या मनातील काम, क्रोध आदी वासना जेव्हा नष्ट होतील, त्यांच्यावर विजय प्राप्त होईल, तेव्हाच श्रीरामांचा प्रवेश आपल्या हृदयमंदिरात होईल. परमेश्वर हा आनंदस्वरूप आहे. तो सत चित आनंद म्हणजेच सच्चीदानंद आहे. तो आपल्या हृदयात प्रवेशला की आनंदाची गुढी आपोआपच उभारली जाते.

स्त्रीला आदिशक्ती मानून तिची पूजा पूर्वीपासून केली जाते. माता पार्वती म्हणजे आदिशक्ती. शंकर आणि पार्वती यांचा विवाह पाडव्याच्या दिवशी ठरला आणि तृतीयेच्या शुभमुहूर्तावर तो पार पडला. तेव्हापासून पाडव्याला स्त्रीच्या रूपात आदिशक्तीची पूजा केली जाते. गुढीपाडव्याचा उल्लेख म्हाईभट यांनी लिहिलेल्या लीळाचरित्रातही आढळतो. ज्ञानेश्वरीत सुद्धा गुढीचा उल्लेख येतो. ज्ञानेश्वर माउली म्हणतात–

अधर्माची अवधी तोडी । दोषांची लिहिली फाडी।
सज्जनांकरवी गुढी । सुखाची उभवी ।।



दासबोध स्तवन




उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


## दशक तिसरा।।।।

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

स्वगुण परीक्षा

जन्माला आलेला प्रत्येक जीव सुखासाठी धडपड करतो पण त्याच्या वाट्याला सुख कमी व दु:खच जास्त येते. असं का ?याचं ऊत्तर समर्थ देतात कीभलतेच किंवा नको ते ध्येय समोर ठेऊन आपले जीवन त्याभोवतीच केंद्रित करतो आणि म्हणून त्याला सतत दु:ख भोगावे लागते.

मानवी जीवाची तीन वैशिष्ट्ये

१)माणसाला मी पणाची जाणीव आहे.

२)त्याला काळाचे भान आहे.

३)भगवंताची जिज्ञासा आहे. प्रयत्न करण्याचे स्वातंत्र्य आहे. तो अति ऊच्च विचार सरणीचा होतो किंवा अतिनीच ही होऊ शकतो. तो काळाचा विचार करतो आणि जाणीव नेणीव याचा विचार करून आपले ज्ञान वाढवतो. भगवंताशी ऐकरूप झाला की निस्वार्थ बनून जगावर प्रेम करतो.

१) जन्मदु:ख निरूपण

कोणताही जीव स्वरूपाला विसरतो तेव्हा तो भगवंता पासुन दुरावतो. थोडक्यात मी पणाने घेरले की भगवंताशी त्याचे नाते तुटते. आणि म्हणून मंडळी एक सांगणे आहे की अहंम् ब्रम्हासीअसे कधीच वागु नका.


समर्थांनी ऐकुण ५३ ओव्या मध्ये हा तिसऱ्या दशकातील पहिला समास व्यक्त केला आहे.

माणसाच्या जन्माचे सुक्ष्म व गुढ तसेच मातेच्या गर्भात जीवाची वाढ होत असताना त्याला जे दु:ख भोगावे लागते त्याचे वर्णन केले आहे.

जन्म म्हणजे दु:ख रूपीझाडाचा अंकुर होय. अंकुर आरंभ आहे. तो वाढतो तसतसा जाणीव नेणिव यांना सामोरे जावे लागते. कधीही नसंपणारा डोंगर म्हणजे जीवन होय.

वेदातांच्या मते जीवाच्या सर्व कर्म साठ्यापैकी काही भाग हे भोगण्यासाठी असतात. चांगले वाईट कर्माच्या सुपरवायझर हा भगवंत आहे त्याच्याकडे पाप पुण्याच्या समतोलाचे दायित्व आहे. भगवंतालाय विसरून केलेले सर्व कर्म म्हणजे पापच होय म्हणून जनाबाई चाअभंगाचे ऊदा, मला ईथे द्यावेसे वाटतेदळीता कांडीता तुज गयीन अनंता. जन्म म्हणजे ज्ञान.

**क्रमश:**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## अखंड समाधानाचा मार्ग ।

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

चित्तात राखावे समाधान ।। चित्तांत ज्याचे राहिले समाधान । तोच भगवंताचा आवडता जाण ।। ज्याचा विश्वास रामावरी । त्याला समाधान स्वीकारी ।। माझे हित रामाचे हाती हा धरिता विश्वास । समाधान मिळत असे जीवास ।। दु:ख ही परमात्म्याची इच्छा जाणून जो भगवंताचा झाला । त्याला देह प्रारब्धावर टाकता आला ।। प्रारब्धाने देहाची स्थिति । हे सर्वच सांगती । पण त्यात मानता येते सुख समाधान । ध्याता एक रघुनंदन ।। तात्पुरते काही तरी औषध घ्यावे । देहाच्या लोभात न सापडावे ।। माझे सांगणे दुजे नाही । जोवर श्वासोच्छवास देही । तोंवर मुखी नाम पाही ।। तरीपण मी सांगतो एक । ठेवावा रामावर विश्वास । तोच साह्यकारी होईल खास ।।

असावे शुद्ध आचरण । करावे भगवंताचे स्मरण ।। कर्तव्याची ठेवावी जागृति । त्यात भगवंताची राखावी स्मृति ।। नामाविण नाही दुजे साधन । हे सांगत आले सर्व संतजन ।। देहाचे अस्तित्व भगवंतासाठी। याहून नाही दुजी उच्च प्राप्ति ।। देहाचे भोग देहाचे माथी । ऐसे सर्व सांगती । परि एक वाटतसे चित्ता । ते दूर होतील एक भगवंत चिंतिता ।। भगवंतावाचून देहाचे सुखभोग । हे न मानिती साधुसज्जन ।। आता जगणे रामासाठी । हा निश्चय मानावा चित्ती ।। जगातील वैभव ऐश्वर्य संपत्ति । लौकिक आणि कीर्ति । हे परमात्म्यावाचून मातीमोल साधुसंत गणती ।। आजवर झाले कष्ट फार । देहाचा भरवसा धरून थोर ।। देहाचे सुखसौख्य आदरसत्कार । हे प्रारब्धाधीन सत्य जाण ।। मुलींनी खेळ मांडला । परि नाही कामाला आला । तैसा प्रपंची थोर झाला । परमात्म्याचा तो न म्हणावा भला ।। रामापरते सत्य नाही । श्रुतिस्मृति सांगतात हेच पाही ।। आता न ठेवावा जगी भरवसा । राम सखा करावा खासा ।। रामाविण अन्य प्रीति । उपजे देहबुद्धीचे संगती ।। आता राम एकच करी ।। तुझा विसर न पडो अंतरी ।। आता जसे असेल तसे होऊ द्यावे । रघुनाथभजनी असावे ।। मागील झाले होऊन गेले । पुढील येणार येऊ द्यावे भले ।। आत न धरावा हव्यास । हेच वाटे जीवास ।। जे जे करणे आणिले मनी । रामकृपे पावलो जगी । माझे आता काही । दुसरे मागणे नाही।। माझे कोणी नाही । मी कोणाचा नाही । जग आणि देह अगदी माझे नाही ।। जे जे काही दृश्य पहावे। त्याचे रूपांतरच व्हावे । हा नेहमीचा अनुभव ठेविता चित्ती । समाधानाची होय प्राप्ती ।।

जोवर श्वासोच्छ्वास देही। तोवर मुखी नाम पाही।।

***




## आठवणींचा आनंद

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

नमस्कार–

मित्र हो– आनंदाने रहाता येणे हे वाटते तसे सोपे नाही, यासाठी मनाला मोठी शिस्त लावावी लागते, कारण पुष्कळजण असे असतात की, त्यांना आपले रडगाणेच गायची सवय असते''या नादात ते इतके वाहवत जातात की, समोर असलेल्या आनंदाला ते पारखे होऊन जातात. अशांना आनंदाचे मोल समजण्यास उशीर लागतो, शिवाय मित्र–वर्तुळात अशा ''रडतराऊ मित्रांना ''टाळणे पसंत केले जाते.

चारचौघात आपण घटना, प्रसंग, व्यक्ती याबद्दलच्या आठवणी सांगतो त्या, या ऐकणारांना आनंद देणाऱ्या असाव्यात '' हे लक्षात ठेवले तर लोक मनापासून ते ऐकतात.

मित्र हो ,आपल्या अंतरी असलेल्या आठवणी ,या निराश मनातील अंधाराला दूर करतात, हे आठवणींचे दीप मनगभारा उजळून टाकतात. मित्रमंडळी, नातेवाईक– गोतावळा, पारिवारिक मैफल असो, किंवा पार्टी, समारंभ असो थोडक्यात जिथे जिथे म्हणून आपण एकत्र येतो, त्या सर्व ठिकाणी आठवणींचा जागर '', हा होतोच असतो.

प्रसंग, घटना, व्यक्ती आणि त्या त्या वेळेची परिस्थिती '', अशा स्वरूपात या आठवणी असतात आणि मग, या गप्पात सहभागी झालेली माणसे, व्यक्ती ,इतकी मनमोकळी व्यक्त होतात की, ऐकणाऱ्यांना ,बोलणाऱ्यांना या व्यक्तीचा इतके दिवस न दिसलेला, लपून राहिलेला भावनिक पैलू दिसतो . आणि विनाकारण झालेले ''पूर्वग्रह'' विरघळून जातात.

हे अभिसरण होण्यासाठी आपण कुणाबरोबर तरी समोरासमोर बसूनच बोलले पाहिजे.तरच ''या मनातले, त्या मनात नेमकेपणाने पोचेल.

''व्हाट्सअप्प मेसेज, किंवा, लेखनातून व्यक्त होता येत असले ,तरी याने ''समक्ष भेटीचा परिणाम साधला जात नाही. कारण हे मेसेज जास्त करून ''पाहिले जातात '', ''वाचले जातीलच ''याची खात्री देता येणार नाही. अंधारात निराश होऊन बसण्यापेक्षा, आपल्या जवळच्या माणसा बरोबर एक कप चहा घेत, काही वेळ बोलून, नव्या– जुन्या आठवणीत हरवून आनंद घेत जावे, मन नक्कीच हलके होते. आठवणींचे मोल किती ही करा, ते ठरवता येत नाही. कटू असो, गोड असो, आवडत्या माणसांच्या आठवणी असो, की मनातून उतरलेल्या व्यक्तीच्या आठवणी असो, आज ती वेळ निसटून गेल्यावर का होईना '', या आठवणी चुका सुधारून घ्या '', असे सुचवतात. आठवणींची ही किमया खरीच खुप मोठी आहे. दुरावलेले जवळ येतील, जे जवळचे आहेत ते अधिक घट्ट जवळीकतेचे होतील.

देवापुढती निरांजन तेवती हर प्रहरी
तैसेची दीप आठवणींचे तेवती अंतरी ।।

***



नीतिशतक निरूपण


अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**न कश्चिच्चण्डकोपानामात्मीयो नाम भूभुजाम् ।**
**होतारमपि जुह्वानं स्पृष्टो दहति पावकः ।।**

अर्थ – आहूती प्रदान करणा–या होत्यासही स्पर्श केला असता अग्नी जाळतो. त्याप्रमाणे, प्रचंड क्रोधी राजांचा कोणी आप्त असत नाही. त्याच्या क्रोधाचा ग्रास सर्वांना व्हावं लागतं.

क्रोधी राज्यकर्ता किंबहुना क्रोधी माणूस हा कोणाचाच सखा नसतो. तो सखा असतो, ते केवळ आपल्या क्रोधाचा. त्यामुळे अशा क्रोधी व्यक्तीकडून रूनेहाची अपेक्षा करणे व्यर्थ आहे; असा आशय या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी सूचित केला आहे.




**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

नारद म्हणाले अजूनही वेळ गेलेली नाही. आता माझ्या जीवनाला कांहीं आलंबन उरले नाही. प्रपंचात कांहिही वेळेवरच करावे लागते. पण परमार्थाला केव्हाही सुरुवात करता येते. त्यास केंव्हाच शेवट नसतो. अंतकाळी जरी मुखी भगवंताचे नाम आले तरी जीवन धन्य होते. अजून तुझी वेळ गेली नाही. तू केवळ राम म्हण. खरे तर यात अडचण का असावी? पण त्यास राम म्हणता येईना ! पूर्ण आयुष्य त्याने मरा मरा म्हटले होते. मग नारद त्यास मरा मरा म्हण म्हणाले. मरा म्हणायला पुण्य लागत नाही पण राम म्हणायला पुण्य लागते ते वाल्या जवळ नव्हते.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

पुण्य व नामाचा काय संबंध आहे?

पुण्याचा परिणाम तशी बुद्धी होणे हा आहे. बुद्धीला ते आधी पटावे लागते.राम शब्द उच्चारने अवघड नाही ते नाव घेण्याची बुद्धी होणे हे अवघड असते. कशासाठी जीवन जगायचे हे आलंबन उरले नाही. त्या रिक्त पणातून आता त्याला राम नामाचे आलंबन अनन्यतेने लागले. नामाचा अनुभव येण्या साठी नामच घ्यावे लागते. नाम गोड नाम गोड अशी स्थिती येते. वाल्या एकाग्रतेने राम नाम अखंड घेऊ लागले भोवती वारूळ जमले कालांतराने नारद तेथून जाताना त्यांनी राम नाम ऐकले. कुठून ऐकू येतेय म्हणून त्यांनी पाहिले तर वारुळातून नाम ऐकू येत होते. तिथे बसताना वाल्या कोळी होता तिथून उठून बाहेर आले ते वाल्मीक ऋषी बाहेर आले.

आपण रामचंद्र प्रभूच्या चरित्रातून काय घेणार हे महत्वाचे आहे. आपल्या कानावर तत्वद्न्यान पडले तेवढ्याने आमची जीव दशा बदलली. आत बाहेरचा अंधार फिटला असे तुकोबा राय म्हणतात.

**क्रमश:**




## बर (औंदुंबर) – एक आध्यात्मिक वृक्ष

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

उंबर जिथे आहे तिथे श्री दत्तगुरुंचा वास असतो, असे हिंदू धर्मात मानले जाते. याच्या औषधी गुणांमुळेच उंबराच्या वृक्षाला आध्यात्मिक महत्व आहे. तेव्हा हा वृक्ष आपल्याला अमाप अशी निसर्गदत्त, औषध योजना बहाल करतो.

उंबराच्या सालीचा काढा करून , त्यांत, वेलची, खडीसाखर टाकून सरबत करावे, कँसर सारख्या रुग्णाच्या अंगाचा जो दाह होतो, त्यावर आराम पडतो. दिवसांतून तीनदा घ्यावे. औंदुबरावलेह हे प्रसिद्ध औषध पित्तज विकारांवर प्रसिध्द आहे.

जखम झाल्यस याच काढ्याने धुतल्यास, ती वेगाने बरी होते. अतिसाराच्या वेळी रक्त पडल्यास हाच काढा घ्यावा. गर्भाशयाची सूज कमी करण्यासाठी, रक्तप्रदर, श्वेतप्रदर, मासिकधर्म जास्त जात असेल, तर सालिचा काढा, पोटातून देतात. गर्भपात, होउ नये म्हणून, गर्भाचे पोषण निट व्हावे म्हणून, याच्या सालिचा काढा घेतात.

भस्मक नावाचा रोग आहे त्यांत सारखी भूक लागते. पोट भरल्याची जाणीव होत नाही. तेव्हा, उंबराची साल दूधांत घोटून द्यावी. कावीळीत, उंबराचे पिकलेले अर्धे पान विड्यातून देतात. ज्वरदाह, तीव्र तापात, पिकलेले उंबर द्यावे,गोवर, कांजण्या, अतिसार, उन्हाळी, मधुमेह, या सर्व रोगांवर उंबराचे फळ, पाने, फुले उपयोगात आणली जातात.

किटकदंश, विंचूदंश झाल्यास झाडाची पाने वाटून लावल्यास, दाह, वेदना, कमी होतात. तोंडातले अल्सर, व्रण, छाले, यावर उंबराच्या पानावर असे बुडबडे वर दिसतात. ते काढून त्याचि चटणी मधातून चाटण म्हणून द्यावे. तोंडाचा दाह कमि होतो..

अंगात उष्णता, कडकी असल्यास उंबराची दोन फळे रोज सकाळी खडीसाखरेसोबत खावीत.


संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९


तृष्णेचा आजार बरा होतो. जेव्हा खुप तहान, तहान होते, जीव कासावीस होतो, तेव्हा उंबराची साल, वा कच्ची फळे पाण्यात कुस्करून सरबत करून द्यावे


डांग्या खोकल्यावर उंबराचा चिक टाळूवर लावावा ताबडतोब थांबतो.


किडनि स्टोन (मूतखडा) – उंबराच्या जुन्या झाडाच्या खोडाला खाच द्यावी व तिथेच एक भांडे अडकावे रात्रभर रस झिरपून भांड्यात गोळा होईल, तो सकाळी पिण्यास घ्यावा. किडनी स्टोन वितळून मूत्रावाटे बाहेर पडतात.

उंबर फळ दूधांत शिजवून खाल्ल्यास पचनसंस्था मजबूत होते, पोटाचे सर्व विकार बरे होतात. विशेषतः हे थंड गुणधर्माचे असल्यानेच, आम्लपित्त, मळमळ, पोटात दाह, अल्सर, सारखे आजार याच्या सेवनाने बरे होतात.

तेव्हा आपल्या परीसरात याचे झाड असणे आवश्यक आहे. अतिशय, उपयोगी, औषधी गुणधर्माचा हा वृक्ष कायम चिरतरुण ठेवतो.

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

पण या सगळ्या कालावधीत छोट्या चारुशीचे मन मात्र तो जिंकू शकत नाही. आपल्या आईवडिलांसह सगळे लोक या तारापदवर प्रेम करू लागल्यामुळे चारुशीचा जळफळाट होतो आणि ती त्याचा द्वेष करू लागते. पण काही क्षण असे येतात की नकळत का होईना मनाच्या एका कोपऱ्यात कुठेतरी तिला त्याच्याबद्दल ओढ वाटते. या सगळ्या संमिश्र आणि गुंतागुंतीच्या भावना आहेत. जमीनदार आपल्या लाडक्या मुलीचे म्हणजे चारुशीचे लग्न तारापदशी करायचे ठरवतात. पण मनमौजी असणारा आणि कुठेही अडकून न पडणारा तारापद तेथून गुपचूप पळ काढतो. तो अतिथी बनूनच राहतो.

या कथेत रवींद्रनाथांनी सगळ्या पात्रांच्या मानवी स्वभावाचे विविध रंग दाखवले आहेत. पित्याचे हृदय असलेला आणि तारापदवर पित्याप्रमाणे प्रेम करणारा जमीनदार मतीलाल, तारापदवर मुलासारखी माया करणारी आई अन्नपूर्णा, हट्टी, दुराग्रही आणि द्वेष करणारी पण मनातून चांगली असलेली चारूशी. सगळ्यात लक्षात राहतो तो तारापद. तो सगळ्यात असूनही कशातही लिप्त होत नाही. रवींद्रनाथ त्याला गढूळ पाण्यात पोहणाऱ्या पांढऱ्या शुभ्र पंखाच्या राजहंसाची उपमा देतात. त्याने जग पाहिले आहे, अनेक लोकांना तो भेटला आहे. पण त्याने त्यांच्यातील सद्गुण तेवढे घेतले आहेत. वाईट गुणांपासून तो कोसो दूर आहे. एक प्रकारे हा मुलगा म्हणजे रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब आहे असे म्हटले जाते. कारण त्यांचे निसर्गाबद्दलचे प्रेम, संगीत आणि कलागुणांची आवड, त्याचप्रमाणे सगळ्यात राहूनही सगळ्यांपेक्षा वेगळा अशा गुणांचे सुरेख मिश्रण असलेला हा तारापद आहे. रवींद्रनाथांच्या आणखी काही कथांबद्दल पुढील भागात जाणून घेऊ या.



## जात्यावरच्या ओव्या......

### नातेसंबंध : बहिण-भाऊ

बहिणीला सासुरवास
भाऊ आला चोरावानी,
दैना बाईची पाहून
आसू टाके मोरावानी ||२२||

बहिणीला सासुरवास
भाऊ ऐकतो दुरून
जाय बहीण मरून
नाही पाह्यचो फिरून ||२३||

संदर्भ : कै. गवणाबाई बोराडे
संकलन : सौ मनोरमा बोराडे

# भगवान महावीर : विश्वशांती पथ दर्शनाचे प्रवक्ता

ज्योतिर्मय साहित्य

जैन धर्मामध्ये २४ तीर्थंकर परंपरा आहे. जैन धर्माचे संस्थापक प्रथम तीर्थंकर भगवान ऋषभदेव आदिनाथ हे आहेत. तर २४ वे अंतिम तीर्थंकर भगवान महावीर हे होत. तीर्थंकर म्हणजेच संपूर्ण ज्ञानाच्या (केवलज्ञान, कैवल्य, सर्वज्ञता) प्राप्ती नंतर जे श्रावक श्राविका (गृहस्थ) साधू, साध्वी या रूप चतुर्विध धर्म संघाची स्थापना (तीर्थ स्थापना) करतात व संपूर्ण जीव जातीच्या कल्याणासाठी धर्मोपदेश करतात.

भगवान महावीरांचा जन्म ई.स. पूर्व ५९९, चैत्र शु. त्रयोदशी या दिवशी क्षत्रिय, इक्ष्वाकु वंशीय राजा सिद्धार्थ, राणी त्रिशला देवी यांच्या पोटी वैशाली गणतंत्र राज्यात क्षत्रिय कुंडलपुर (वर्तमान नालंदा जिल्हा, आजची बिहारची राजधानी पटना पासून उत्तरेस ६० किमी,बिहार) या ठिकाणी झाला.

जैन धर्म श्रमणधर्माचा उत्तराधिकारी आहे. श्रमण परंपरा भारतीय धर्म आणि तत्व चिंतनाची फार प्राचीन परंपरा आहे. त्याचा उद्गम जैन तीर्थंकरांपासून, अरिहंता पासून झालेला आहे. प्रथम तीर्थंकर ऋषभदेव आदिनाथ हे होत.जैन धर्मातील सर्व २४ तीर्थंकर हे संन्यस्त होऊन तपस्येच्या मार्गाने सर्वज्ञता प्राप्ती करून अखिल जीव जातीच्या कल्याणासाठी धर्म उपदेश करत असतात.

वर्धमान महावीर हे वयाच्या तीस वर्षापर्यंत राजमहालात राहिले. त्या नंतर संन्यास्त होऊन साडेबारा वर्ष आत्मसाधने मध्ये एकाग्र होऊन केवलज्ञान म्हणजेच सर्वज्ञतेची प्राप्ती केली. पुढे तीस वर्ष भगवंतांनी समस्त जीव जातीच्या कल्याणासाठी धर्मोपदेश केला.

आजच्या काळात भगवान महावीरांच्या तत्त्वज्ञानाची खरी महती जाणू लागली आहे. विज्ञानामुळे मानवाचा भौतिक आणि बौद्धिक विकास होत चालला आहे परंतु त्याच बरोबर भौतिकता आणि भौतिक प्रवृत्ती वादाची ही वाढ होत आहे. माणसाची इंद्रिय सुखलोलुपता वाढते आहे. स्वार्थ,भ्रष्टाचार, अनैतिकता,अन्याय वाढू लागलेत. जगाच्या पाठीवर सतत कोठे ना कोठे युद्धाच्या जीवाला भडकत आहेत. माणसाला आज आत्मसायंमनाची नितांत आवश्यकता आहे. म्हणूनच भगवान महावीरांच्या तत्त्वज्ञानाची आज अखिल मानवास आवश्यकता आहे.

भगवान महावीरांना वैशाख शुक्ल दशमी या दिवशी चौथ्या प्रहरांमध्ये विजयी मुहूर्तात जांभीय ग्राम या ठिकाणी रुजू बालिका नदीच्या उत्तरी तीरावर विहार करत असताना शाल व्रक्षाच्या सानिध्यात गोदोहीका आसनामध्ये तप आचरणात असताना ज्ञानमुद्रेत केवलज्ञान अर्थात सर्वज्ञतेची प्राप्ती झाली.

याच ठिकाणी भगवंतांनी गृहस्थ महिला आणि साधू साध्वींच्या समुदायास दिव्यवाणीने प्रथम उपदेश दिला. तीर्थंकरांच्या दिव्यवाणीचे वैशिष्ट्य असे असते की भगवंताचे ओठ न हलता दिव्य ध्वनी सर्व दिशेमध्ये सर्व प्राण्यांना समजेल अशा भाषेमध्ये प्रसारित होते. चारीही दिशेने भगवंताच्या मुखमलाचे दर्शन होत असते.

प्रथम प्रवचनात महावीरांनी आत्मसाक्षात्काराच्या चतुरंग मार्गाचे प्रतिपादन केले.

१. सम्यक दर्शन : सत्यावर श्रद्धा ठेवणे. खरे गुरु, धर्म व शास्त्रावर श्रद्धा ठेवणे.

२. सम्यक ज्ञान : वस्तुमान्त्राचे खरे स्वरूप जाणणे.

३. सम्यक चारित्र्य : संयमा सह अचरण करणे. तपो झाले द्वारा आत्मशुद्धी करणे.

या जगाचे मुख्य तत्व दोन आहेत. आत्मा (जीव) आणि अनात्मा (अजीव). जीव आणि आत्म्याची शरीर मुक्त अवस्था म्हणजेच परमात्मा. आत्म्यापासून परमात्मा होण्याचे अहिंसा, सत्य, संयम धर्माचा अवलंब करणे हेच साधन आहे.

भगवान महावीरांनी समता धर्माचे ही प्रतिपादन केले. समता धर्म आहे आणि विषमता हा मोठा अधर्म आहे. आंतरिक क्षमतेच्या दृष्टीने सर्व जीव समान आहेत. कोणी लहान नाही किंवा कोणी मोठा नाही. विकासाच्या दृष्टीने जीव अनेक प्रकारचे आहेत. समताधर्माच्या पालनासाठी भगवंतांनी स्वतःस हीन समजू नये असे सांगितले. तसेच इतर जीवांचा द्वेष करू नये व इच्छित वस्तूच्या प्राप्तीने आनंद व न मिळाल्यास खेद करू नये असेही प्रतिपादन केले.

सुखात आनंदी व दुःखात दयनीय होऊ नका .स्तुतीने फुलून जाऊ नका, निंदेने सुकून जाऊ नका,सन्मान प्रसिद्धीने गर्व आणि अपमानाने तुच्छता वाटून घेऊ नका. कोणासही हीन दिन असे समजू नका.जीवनातील सर्व द्वंद्वात तटस्थ रहावे आणि समतापूर्वक जीवन हीच अहिंसा आहे असा उपदेश भगवंतांनी केला.

भगवान महावीरांनी सत्य धर्मासाठी विशेष प्रवचन केले. ते म्हणाले सत्य ईश्वर आहे, तेच सर्व सृष्टीमध्ये सार तत्व आहे त्याचा शोध घ्या. जीवनातील कोणत्याच व्यवहारात असत्याचा प्रयोग करू नका. सत्य हेच शाश्वत आहे, त्याच्या पालनासाठी त्यांनी काही नियम सांगितले.

१. मानसिक सत्य : मनाने सत्य रहा, मनात जो भाव आहे तोच प्रदर्शित करा.

२. वाचिक सत्य : असत्य किंवा खोटे वचन बोलू नका.

३. कायिक सत्य : शरीराने असत्य इतर जीवास क्लेशकारक असे संकेत करू नका.

यासह संवादामध्ये सत्य असावे, ऐकण्यात आणि सांगण्यात समानता असावी असेही भगवंतांनी विशेषत्वाने सांगितले.

अस्तेय किंवा अचौर्य बाबत एका विशेष प्रवचनात भगवान म्हणाले, इच्छे वर संयम असू द्या. आपल्या इच्छावर संयम असणारा इतरांच्या वस्तू अधिकार याचे हरण करत नाही. असंयमाने राग द्वेष वाढतात,नंतर मोह वाढतो.ज्याचा मोह वाढतो त्याचे दुःख वाढते. जर दुःखापासून सुटका हवी असेल तर इच्छावर संयम असू द्या. इच्छा संयम हा शाश्वत धर्म आहे त्याच्या पालनासाठी

१. वस्तूंचा अनावश्यक वापर टाळा.

२. आवश्यकता आणि अनावश्यकता याचा विवेक असू द्या.

३. वस्तूंच्या वापरासाठी आपल्या इच्छा मर्यादित करा.

४. अल्पशा सामूग्रीमध्ये जीवनात संतोष माना.

ब्रह्मचर्य तत्वाचे प्रवर्तन करताना महावीर असे म्हणाले की, अब्रह्मचर्येच्या असक्ती ला जिंकल्यानंतर किंवा काम प्रवृत्तीवर विजय मिळवल्यानंतर उर्वरित असक्तीतून निवृत्त होणे सुलभ होते. महासागरात पोहोचल्यानंतर नदीत पोहणे कठीण असत नाही. ब्रह्मचर्य हा शाश्वत धर्म आहे व त्याच्या पालनासाठी

१. वक्तव्यावर बोलण्यावर संयम ठेवा.

२. शुद्ध सात्विक आहार ग्रहण करा.

३. दृष्टीचा संयम असू द्या, विकार सहित दृश्य पाहू नका.

४. स्मृतीचा संयम असू द्या. भूतकाळातील असह्यमाच्या स्मृती चे आवर्तन करू नका. वर्तमानामध्ये संयमाने जागा, भविष्यातील इंद्रिय सुखाची चिंता न करता त्याबद्दल विविध कल्पना करू नका.

५. पाचही इंद्रियावर, व त्यांच्या सर्व विषयांवर आपले नियंत्रण असू द्या.

६. गृहस्थांनी अधिक असक्ती नस ठेवता स्वदार संतोष व्रत धारण करावे. आत्म दर्शनाचा अभ्यास करा, स्वयंकेंद्रित व्हा,आत्मलीन व्हा,स्वतःमध्ये सतत रममाण होणे हेच ब्रह्मचर्य आहे.

अपरिग्रहाच्या सिद्धांताचे भगवान महावीरांनी विस्तृत विवेचन केले. परिग्रहात आसक्त मानव वैर वाढवतो



त्यासाठी पदार्थावर आसक्ती ठेवू नका अनासक्ती शाश्वत धर्म आहे. त्याच्या पालनासाठी शब्दावर आसक्ती ठेवू नका, रूपावर आसक्त होऊ नका, रस सौंदर्यावर आसक्ती ठेवू नका, स्पर्शाने आसक्त होऊ नका. आसक्ती आणि त्याच्या कारणांपासून दूर राहणे हाच अपरिग्रह आहे. परिग्रहाने हिंसा वाढते व अकारण संग्रह केल्याने जीवांमध्ये द्वेषभावना वैरभावना वाढतात.

भगवान महावीरांनी मुनी धर्माच्या स्थापनेनंतर गृहस्थ धर्माची व्याख्या केली. भगवान म्हणाले, गृहस्थ हा परिवार समाज, राज्य, आदिं पासून मुक्त होऊ शकत नाही तरीही त्याने आंशिक प्रमाणात व्रतांचे पालन आवश्यक करावे.

१. मोठ्या हिंसेचा त्याग करावा

२. महान असत्याचा त्याग करावा.

३. चोरीचा प्रयत्न करू नये.

४. स्वाधार संतोष व्रत धारण करावे.

५. परिग्रह संग्रह सीमित असावेत.

या प्रथांच्या पाठबळासाठी काही सहाय्यक व्रतांचा अभ्यासही भगवंतांनी सांगितला.

१. सर्व दिशांना जाण्याची मर्यादा ठरवून त्या बाहेर जाऊन हिंसा आणि व्यवहाराचा त्याग करावा.

२. सीमा बाह्य वस्तूंचा उपभोग टाळावा.

३. अनावश्यक वस्तूंचा उपभोग घेऊ नये.

४. समतेचा अभ्यास असावा.

५. दैनिक व्यवहाराची सीमा निर्धारित करावी.

६. आत्म उपासनेसाठी नित्य क्रमात वेळ द्यावा.

७. त्याग तपश्चर्या संयम पूर्वक उपासना व्रत अंगीकारावे.

बलराज संघई
९४२००१५१०८
छत्रपती संभाजीनगर

मिथ्यात्व,आसक्ती, आणि भोग लालसेने जखडलेल्या माणसांनी वाणी संयम,अनासक्ती, अपरिग्रहाचा पडताळा पाहिला, प्रकाश पाहिला आणि हजारो व्यक्ती भगवान महावीरांचा उपदेश शिरसावंद्य मानून शिरोधार्य मानण्यास प्रवृत्त झाले. भयानक परिस्थितीमुळे विचारांना एक नवी दिशा मिळाली आणि भौतिक गोष्टी असार मानून लोक प्रवृत्ती मार्गाचा त्याग करून निवृत्तीच्या मार्गाकडे अहिंसेकडे वळले.

भगवान महावीरांनी जातिवाद तात्विक मानले नाही. ते म्हणाले मनुष्य स्वतःच्या कर्माने आचरणाने आणि व्यवहारानेच स्वतः ब्राह्मण,वैश्य,क्षत्रिय किंवा शूद्र होत असतो. वर्ण व्यवस्था मनुष्य द्वारा कृत,स्थापित आहे ती ईश्वरीय व्यवस्था नाही.

मनुष्य स्वतःच स्वतःचा भाग्यविधाता आहे. सुख दुःखास स्वतः कारणीभूत आहे. तो ईश्वरीय सत्तेने संचालित नाही. आत्मा हाच परमात्मा आहे. त्यात ईश्वर वेगळा नाही. आत्मसाधने द्वारा कर्ममुक्त होणारा ईश्वर बनतो. भगवंतांनी उपदेशातून व्यक्तीतल्या निद्रिस्त परमात्म्यास जागृत केले.

कर्माने पिढीत जनतेस भगवंतांनी प्रेरणा दिली. याबाबत भगवान महावीर म्हणाले की पुरुषा! तू स्वतः पराक्रम कर, जो मनुष्य आपल्या शक्तीचा उपयोग करत नाही, तो आपल्या दैवी प्राप्तीपासून वंचित राहतो. जोपर्यंत म्हातारपण येत नाही अवयव थकत नाहीत तोपर्यंत संयम साधना करा. भगवंतांनी दैववाद स्वीकृत केला नाही परंतु त्यांनी पुरुषार्था पासून दूर जाणाऱ्या जनतेस दैववादाच्या, भाग्यवादाच्या बेडी तून मुक्त केले.

भगवंतांच्या वाणीतून समन्वयाची धारा प्रवाहीत झाली. त्यात दैवाला स्थान नाही, एकट्या पुरुषार्थासही स्थान नाही. तर भाग्य आणि पुरुषार्थ दोहोंची संगत हीच त्या धारेचा मुख्य प्रवाह आहे. या प्रवाहानेच भारतीय जनतेस चमत्कार व कर्मण्यता, अनिष्ठ रूढींपासून मुक्त पुरुष आणि जागृती वाढवली त्यातच भारतीय जनता भारतीय आत्मा प्रफुल्लित झाला.

या प्रकारे भगवान महावीरांनी केवल ज्ञान किंवा कैवल्य अर्थातच सर्वज्ञतेच्या प्राप्तीनंतर तीस वर्षांपर्यंत हिंसा व कर्माने पिढीत जनतेस सत्य मार्गाचा उपदेश केला. शाश्वत अशा सुख प्राप्ती करणाऱ्या धर्माची त्यांनी व्याख्या केली, याच क्रमात त्यांनी जनजनांचा उद्धार केला. जनतेच्या अनेक जिज्ञासांचे समाधानही केले. भगवान महावीरांनी प्रतिपादन केलेल्या सर्वच तत्वांचे दर्शन एका छोट्याशा लेखांमधून करणे अशक्य आहे. त्यासाठीच भगवंताच्या उपदेशाचा प्रमुख भाग या ठिकाणी नोंदीत केला आहे.

भगवंताच्या उपदेशातून असंख्य असे प्रकांड पंडित,विद्वान शिष्य निर्माण झाले. त्यामध्ये प्रमुख गौतमस्वामी, सुधर्मा स्वामी इत्यादी अकरा असे मुनी समुदायाचे नायक म्हणजेच गणधर पंडित होते. या सर्व आचार्यांचे मिळून ४४०० शिष्य होते. या आचार्यांनी आणि शिष्यांनी त्यातील उपाध्याय मंडळींनी पुढे भगवान महावीराच्या उपदेशाचे शास्त्रांमध्ये मांडणी केले. तेच जैन आगम ग्रंथ म्हणून आज प्रकाशित आहेत.

केवलज्ञान अर्थात सर्वज्ञता प्राप्तीनंतर भगवान महावीरांचे जीवन केवळ समस्त जीव जातीच्या आत्म ऊद्धारासाठी आणि कल्याणासाठी अहिंसा,सत्य,शांती,अपरिग्रह, ब्रह्मचर्य या तत्वांचा उपदेश करण्यातच सत्कारणी लागले. वयाच्या ७२ व्या वर्षी भगवंतांचे कार्तिक कृष्णा अमावस्ये च्या दिवशी पावापुरी ( आजचे नालंदा जिल्हा, बिहार ) येथे महानिर्वाण झाले.

भगवान महावीरांची अहिंसा योध्याची अहिंसा आहे ज्याने भगवान महावीरांचे चरित्र पूर्ण जाणले तो अहिंसेस भ्याडपणा म्हणण्याचे धाडस करणार नाही. अभय आणि पराक्रम त्यांच्या अहिंसेस जोडलेला आहे. भगवान महावीरांची निवृत्ती अकर्मण्यता नाही ती कर्मावरील विजयाची अजिंक्य अशी शक्ती जागृत करणारी महान गाथा आहे. म्हणूनच भगवंताच्या वाणीमध्ये विश्वशांतीच्या पथ दर्शनाची क्षमता आहे.

***

# वाचकांना खिळवून ठेवणारा ऐतिहासिक दस्तावेज : आपली माणसं

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)

ऋण काढून सण साजरे करू नका हे सांगणारा. स्वतःचा व्यवसाय. पैसा अडका भरपूर परंतु उगीचच पैसे वाया घालणे हे त्यांना पटणारे नव्हते. स्वतःच्या मुलाचे लग्न सामूहिक विवाह सोहळ्यात केले. खऱ्या अर्थाने सुधारक असलेले सीताराम अग्रवाल यांनी समविचारी मित्रांच्या सहकार्याने कै. दादासाहेब अन्वीकर स्मारक ग्रंथालय स्थापन केले. ग्रंथालय संघाची जिल्हास्तरीय दोन अधिवेशने भरविली. या ग्रंथालयास डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार मिळवून दिला. सदर पुरस्कार राज्यपाल पी.सी. अलेक्झांडर यांच्या हस्ते तो त्यांनी स्वीकारला. *ग्रंथ वेडा माणूस म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जात असे.* तालुक्यात अनेक ठिकाणी वाचनालय उघडण्यास मदत केली. हुशार, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली. जगावेगळा असलेला हा माणूस खऱ्या अर्थाने सुधारक होता. लेखकांनी त्यांची दखल घेऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला.

डॉ. डी सी पाटील–

जन्मभूमी एरंडोल तालुक्यातील खडके बुद्रुक (जि. जळगाव) नांदेड येथून बी.ए. एम. एस. पदवी आणि कर्मभूमी सिल्लोड मध्ये दवाखाना. सामाजिक कार्याची आवड परंतु शंभर टक्के प्रोफेशनल राहू नये तसेच शंभर टक्के सोशलही राहू नये हा विचार घेऊन रुग्णसेवा केली. फारसा पैशाचा कमाईचा विचार केला नाही.

सामाजिक जाण आणि भान असणारा रंगकर्मी– हरी विश्राम दांडगे

पुढे हरिभाऊ अन्वीकर या नावाने महाराष्ट्राला ओळख. शिक्षणाचा गंध नाही आई–वडिलांचे छत्र लहानपणी हरवलं. निंदन, खुरपणी, गुरेढोरे सांभाळत, पेरू बाग सांभाळत जगणं चालू होतं. परंतु त्यांच्यातला कलाकार गप्प बसू देत नव्हता. हरिभाऊ अन्वीकर लोकनाट्य मंडळ उभे करून नाव कमावलं. सिल्लोड शहरांमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे पुतळे उभारण्यासाठी त्यांनी खूप मोठी मदत केली.

आमच्या जवळची अति श्रीमंत व्यक्ती–राघो महार (भगत)

राघो महार हा विदर्भातील जवळपास सर्वच बौद्ध बांधवांना आणि सवर्ण मंडळीलाही माहीत आहे.

लेखकांनी या व्यक्तीच्या कार्याच्या आलेख मांडतांना त्यांच्या घरातील व्यक्तीपर्यंत जाऊन माहिती गोळा करून घेतली. खरा इतिहास हा वाचकांपुढे मांडण्याचं काम लेखकाने आपल्या विलक्षण शैलीत केले. दहा हजार एकर शेती, १००० बैल जोड्या, ५०० पेक्षा अधिक गुरेढोरे, सोन्याच्या बैल जोड्या डझनभर मुनीम. समाज स्तरावर सकारात्मक कार्य करणारे मायाळू आणि श्रीमंत व्यक्तिमत्व लेखकांनी उत्तम साकारलं आहे. वाचकांना हे प्रकरण नक्कीच आवडेल.

माणसं आपल्या अवतीभवती असतात मग ती नात्या– गोत्यातील असो वा मैत्रीतून निर्माण झालेल्या संबंधातली ती जेव्हा आपल्यावर जीवापाड प्रेम करतात, ऋणानुबंध घट्ट होतात आणि त्यांची मध्येच एक्झिट होते तेव्हा ती मनाला वेदना देऊन जातात.

लेखकांनी काही व्यक्तिचित्रे रंगवताना त्यांच्या आयुष्यातील प्रसंग हे हृदयस्पर्शी असल्याने मनाला वेदना देऊन जाणारे आहेत.

निर्भीड, निडर, मित्रशील सुनील– मोठ्या भावाचा मुलगा

सुनीलचं शिक्षण लेखकाने आपल्या घरी ठेवून पूर्ण केले. त्याचं लग्न झालं दोन मुलं झाली. सर्व काही सुरळीत असताना त्याची अचानक एक्झिट झाली. हा प्रसंग मनाला वेदना देऊन जातो.


शोभाताई–शोभाताई भीमराव राऊत

ह्या लेखकाच्या नात्यातील दोघेही पती–पत्नी लेखकाच्या कुटुंबावर प्रेम करणारी. शोभाताईचे पती एअर इंडिया मध्ये कामाला. लेखकांचा नवीन संसार शोभाताई बघायला आल्या. आपुलकीने चौकशी केली. माणसं कशी जोडावीत आणि जपावीत हे शोभाताईकडून शिकण्यासारखा आहे. शोभाताई या जगातून निघून गेल्या तेव्हा त्यांच्याबद्दलच्या भावना लेखकाने हळवेपणाने व्यक्त केल्या. वाचताना वाचकही भाऊक होऊन जातात.

दुसरा प्रसंग

## पुस्तक परीक्षण

अंभोरे बी.जी




आणि तो गेला–सुखदेव आश्रुबा गवई हेदेखील लेखकांच्या खूप जवळचे मित्र होते. त्यांच्या निधनाचा प्रसंग तर वाचकांच्या स्मरणात सदैव राहणार आहे. आईच्या जलदानविधीच्या कार्यक्रमाची बातमी सांगता सांगताच तो मान टाकतो, हा प्रसंग मनाला वेदना देणारा आहे. तो प्रसंग लेखकाने काही प्रलयकारी शब्दाने व्यक्त केला. माणसाचं जीवन म्हणजे पाण्याचा बुडबुडा. कधी फुटल सांगता येत नाही. तो प्रसंग वाचला तर माणूस गहिवरून जातो. आपल्याही डोळ्याच्या पापण्या नकळत ओल्या होतात.

लोकांचा लोकांसाठी लिहिणारा गायक– कवी वामनदादा

–असे एक गाव नाही
वामन जिथे नाव नाही.

ज्यांची पूर्ण हयात बाबासाहेबांचं कार्य लोकांपर्यंत आपल्या वाणीतून, गीतातून पोहोचवण्याचं काम केलं अशा या गायकाच्या कार्याची ओळख आठ पाने लिहून वाचकांच्या पुढे त्यांच्यातील कवीची ओळख करून दिली.

राजकारणातील व्यक्तींची ही महती त्यांनी आपल्या लेखणीतून लीलया साकारली आहे.

शून्यातून विश्व–अब्दुल सत्तार अब्दुल नबी

यामध्ये त्यांचा जीवनपट मांडला.ग्रामपंचायत सरपंच पदापासून तर आमदार आणि कृषीमंत्री पदापर्यंतची वाटचाल यामध्ये त्यांनी नमूद केली.

दादा – माणिकराव पालोदकर

सिद्धेश्वर साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष, पंचायत समिती सभापती लोकसभा सदस्य विधानसभा सदस्य, शैक्षणिक संस्था पतसंस्था नागरी सहकारी बँक अशा अनेक कार्यकर्तृत्वाचा आलेख त्यांनी मांडला आहे.

लढवय्या माणसाचे चित्रण करणारा साहित्यिक– अण्णाभाऊ साठे

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदान. १४ कथासंग्रह, ३५ कादंबऱ्या, पंधरा पोवाडे, १६ वगनाट्ये, सात चित्रपट कथा, तीन नाटके, एक प्रवास वर्णन, एक शाहिरी पुस्तक असं विपुल लेखन केलेल्या अण्णाभाऊंच्या बद्दल लिखाण केलं आहे.

अजूनही खासदार उत्तमसिंग पवार, पँथर दिनकर ओंकार, ज्येष्ठ पत्रकार स .सो. खंडाळकर, रतनकुमार पंडागळे, ऋषिकेश कांबळे, पद्मश्री डॉ. प्रभाकर मांडे, व्यापारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम गुप्ता, सुनील वाकेकर, पुंडलिक नाना चापे आदी व्यक्तिमत्वे मनाचा ठाव घेतात.

आकर्षक व अर्थपूर्ण मुखपृष्ठ नजरेत भरणारं आहे. मलपृष्ठावर माजी कुलगुरू प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे यांनी अतिशय बोलकी पाठराखण केली आहे. एकंदरीत आपली माणसं मनाचा ठाव घेणारी आहेत. ओघवती व सोपी भाषा असल्याने वाचक मंत्रमुग्ध होत जातात. लेखकाने वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. लेखकाने प्रत्येक व्यक्तीचित्र लिहिताना चित्रपट जसा पुढे पुढे जातो तशी तशी वाचकाला उत्सुकता निर्माण होत जाते. पुढच्या प्रसंगाची ओढ लागते. सदरील ग्रंथ वाचकांच्या मनाचा ठाव घेणारा आहे, एवढे मात्र निश्चित.

आपली माणसं: शिवाजी वाठोरे
पद्मपाणी प्रकाशन, सिल्लोड, छ. संभाजीनगर.
पृष्ठे: १९२
किंमत: २८०/-

# अहिंसेचे प्रतीक भगवान महावीर

ज्योतिर्मय साहित्य

जैन धर्माचे चोविसावे तीर्थांकार अहिंसेचे मूर्तिमंत प्रतीक भगवान महावीर यांची आज जयंती. भगवान महावीर यांचा जन्म वैशाली राज्याच्या कुंडलपूर येथे इसवी सन पूर्व ५९९ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सिद्धार्थ तर आईचे नाव त्रिशला असे होते. त्यांच्या भावाचे नाव नंदिवर्धन तर बहिणीचे नाव सुदर्शना असे होते. त्यांचे बालपण राजेशाही थाटात गेले. भगवान महावीर आठ वर्षाचे असताना त्यांना शिक्षण आणि शस्त्र विद्येचे प्रशिक्षण घेण्यासाठी शाळेत पाठवण्यात आले. भगवान महावीरांचे कुटुंब जैनांचे तेविसावे तीर्थांकार भगवान पार्श्वनाथ यांचे अनुयायी होते. भगवान महावीर २८ वर्षाचे असतानाच त्यांच्या आईवडीलांचे निधन झाले त्यानंतर त्यांनी श्रामणी दीक्षा घेतली आहे. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले. त्यांनी १२ वर्ष मौन पाळले. हटयोग्याप्रमाणे त्यांनी शरीराला कष्ट दिले. ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी जनकल्याणासाठी उपदेश देण्यास सुरुवात केली त्यासाठी त्यांनी त्याकाळी प्रचलित असणारी अर्धमागधी भाषेचा आधार घेतला. इंद्रिय व विषय



वासनेचे सुख दुसऱ्याला दुःख देऊनच मिळवता येते असे त्यांचे मत होते त्यामुळेच त्यांनी जैन धर्माच्या अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह याबाबींमध्ये ब्राम्हचर्याचाही समावेश केला. त्याग, संयम, प्रेम, करुणा, शील व सदाचार हे त्यांच्या प्रवचनाचे सार होते. त्यांनी चतुर्वेध संघाची स्थापना करुन समता हेच जीवनाचे लक्ष असल्याचे सांगितले. देशात ठिकठिकाणी फिरून भगवान महावीरांनी या पवित्र संदेशाचा प्रसार केला. इसवी सन पूर्व ५२७ मध्ये बिहार मधील पावापुरी येथे वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांचे निर्वाण झाले. तो दिवस होता कार्तिक कृष्ण अमावस्येचा. भगवान महावीरांच्या जन्म आणि निर्वाण दिनादिवशी घराघरात दिवे लावले जातात. भगवान महावीर म्हणतात की, जाणते किंवा अजाणतेपणातून कोणाची हिंसा करणे योग्य नाही. याशिवाय दुसऱ्याच्या मार्फतही कोणाची हिंसा घडवून आणू नये कुठल्याही जीवांना मन, शरीर किंवा बोलण्याने दंडित करू नये. सर्वांच्या आत एकच आत्मा आहे. आपल्या प्रमाणेच प्रत्येक प्राण्यांना आपापले प्राण प्रिय आहे त्यामुळेच कोणत्याही प्राण्यांप्रति हिंसा करू नये. स्वतः हिंसा करणारा, दुसऱ्यांकडून हिंसा घडवून आणणारा व दुसऱ्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणारा स्वतःप्रति द्वेष वाढवत असतो असे तेच मत होते. कोणत्याही प्रकारची हिंसा न करणे हीच ज्ञानाची खरी परिभाषा आहे. अशाप्रकारे त्यांनी ज्ञानाची व्याख्या केली आहे. आपल्या आत्म्याविषयी असणारा भाव इतर प्राण्यांविषयी असू द्या. सर्व प्राणिमात्रांविषयी अहिंसेचा भाव राखा मन, वाणी आणि शरीराने कोणाचीही हिंसा न करणारा खरा संयमी म्हणून गणला जातो अशी संयमी माणसाची व्याख्या त्यांनी केली. चालताना, बसताना, बोलताना, जेवण करताना असावध असणारा, स्वतः ची पूर्ण खात्री झाल्याशिवाय, पहिल्या व विचार केल्याशिवाय कृती करणारा हिंसा करत असतो असे त्यांचे मत होते. दुःखास सर्वच जीव घाबरत असतात हे लक्षात घेऊन कोणत्याही जीवास कष्ट पोहचवणे टाळावे असे ते आपल्या प्रवचनात नेहमी सांगत.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# गणपती बाप्पा मोरया....

ज्योतिर्मय साहित्य

श्री गणेश आराध्य दैवत सर्वांना अगदी जवळचा आपला गणपती बाप्पा गजानन, लंबोदर, भालचंद्र, विनायक किती ती नावे आणि कोटी कोटी रूपे मन तल्लीन होऊन जाते अशी प्रसन्न मूर्ती गजाननाची डोळ्यातली लोलक हिऱ्यासारखीत्यात पाहिले तर साऱ्या जगाचा विसर पडतो.भक्तांविषयी प्रेम दाटलयं बाप्पाच्या मनात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच गणपती बाप्पा मोरया चा गजर करतात.

श्री गणेश ही बुद्धीची देवता आहे.महर्षी वेद व्यास यांनी कथन केलेले महाभारत श्री गणेशाने लिहिले .लिखाणात खंड पडू नये या साठी श्री गणेशाने मोरपंख झिजून गेल्यावर आपल्या दाताने ते पूर्ण केले. यामध्ये चारही वेदांचा समावेश आहे . विघ्नहर्ता गणेश सर्व कार्यारंभी पूजिला जातो. पार्वती नंदन शिवशक्ती गणांचा अधिपती आहे मूळातच सृष्टी निर्माण करणाऱ्या आद्य शक्तीचा पुत्र गणेश आणि गजवदनामुळे ओळखला जाणारा गजानन अवघ्या ब्रम्हांडाची प्रदक्षिणा माता पित्यानांच घालून पूर्ण करतो. साऱ्या जगभरात गणपती

मंदिर मूर्ती आढळून येतात. गणपतीचा नैवेद्य मोदक ज्या मध्ये बुद्धी आणि शक्ती साठी गुळ खोबरे तूप.हयाचा वापर केला जातो.गणेशाला वाहिलेल्या दुर्वा दाहनाशक, पित्तप्रकृतीचे शमन करण्यासाठी फारच





प्रतिभा महादेव चौगले
कोल्हापूर

लाभदायक आहेत. श्री गणेश चतुर्थी भाद्रपद महिन्यात येते तेव्हा सगळीकडे हिरवळ दाटलेली असते.. बाप्पाच्या आगमनाने सारी धरती भक्तीमय होते. गोड नैवेद्य दाखवून आरती, स्तोत्र पठण करून मनोभावे पूजा केली जाते. आणि अखेरीस बाप्पाच्या विसर्जनाचा दिवस येतो मन गलबलून येतं आणि निरोप देणं अवघड होतं गणपती बाप्पा पुढच्या वर्षी लवकर या अशी आळवणी करत निरोप दिला जातो. मिळालेले जीवनातील क्षण आनंदाने घालवा निरोप तर प्रत्येकाला द्यायला लागेल हेच सांगत असेल बाप्पा आपल्याला. ह्या बुद्धी देवतेला काय वर मागावा. चौसष्ट कलांचा अधिराज मोरया,

सकल सृष्टी सारी तुझ्या कृपेने सजली ..
प्रगतशील मानवाला बुद्धी तुज मुळे उपजली ..
दोघांमध्ये सजिव नाते दृढ व्हावे.
चरणी तुझ्या मस्तक माझे असावे.

आराध्य श्री गणेश

पार्वती नंदन। कृपेचा सागर।
आम्हासी आधार । तू ची एक ।।

मंगल मूर्ती चे। हो तसे आराध्य ।
कार्य होते साध्य । शुभ दिनी ।।

विघ्न विनाशक। बुद्धीची देवता।
हरवूनी चिंता। मन शांत।।

पाहतो लोचनी। होऊनी मी दंग।
मनीं भाव रंग। उधळीत ।।

मूर्ती हो साजिरी । फुलांनी सजली।
दुर्वा ही वाहिली । गणाध्यक्षा।।

सगुण साकार। वेद आविष्कार ।
निर्मिले ओंकार। शिव सूत।।

द्यावी मज बुद्धी । तुझे गुणगान ।
सफल जीवन। तुझे पायीं ।।

# कॅनडा...

## मला भावलेले रंग (भाग २)



सौ.माधुरी. म.इनामदार
मीसीसागा (कॅनडा)

ज्योतिर्मय साहित्य

रात्री छान झोप लागली.. पण दिवस रात्रीच्या फरकामुळे पहाटे साडेचार वाजता प्रसन्न जाग आली.. इकडे सहा सात महिने बर्फच बर्फ असतो त्यामुळे उबदारपणासाठी लाकडांच्या इमारती बांधलेल्या असतात.. घरात छोट्या छोट्या जाळ्या बसवलेल्या असतात.. बाहेर भरपूर बर्फ पडून थंडी सुरू झाली की सरकार या जाळ्यामधून गरम हवा सोडते त्यामुळे घर उबदार राहते.माझी लेक, जावई ३५ व्या मजल्यावर राहतात. लहान मुलांच्या सुरक्षितेसाठी घराला खिडक्या नाहीत.पण पूर्ण बाल्कनीचे दार सरकवता येईल अशा जाळी आणि काचेच्या दाराचे असते त्यामुळे उजेड आणि खेळती हवा राहते. तिच्या बाल्कनीतून खूप छान सूर्यास्त दिसतो. बाहेर ८ महिने बर्फ पडत असला तरी घर उबदार असते. सात /आठ महिने जरी बर्फ पडत असला तरी उरलेल्या ४/५ महिने निसर्ग अगदी सूर्य प्रकाशाची भरभरून उधळण करतो. सकाळी साधारण ५.३० वाजता सूर्योदय होतो आणि ९ वाजले तरी पश्चिमेवर सूर्यबिंब रेंगाळत असते. सगळीकडे खूप सुंदर वातावरण असते. उंच उंच काचेच्या इमारतीवर सूर्यकिरणांचा लालीमा परावर्तित होत असतो. आणि रात्री अनेक दिव्यांच्या रोशणाईमुळे जणू नक्षत्रे खाली उतरून आली आहेत असे वाटते.



पुढे मुख्य रस्त्यावरही वेगवेगळी सुबक घरे आणि रूप रंगांची उधळण करणारी अनेक आकर्षक फुले पाहून भान हरपून जाते..वाटेत ससा, खार असे क्वचित दिसणारे प्राणी इथे सहज दिसतात. चिमण्या तर आहेतच पण अनेक सुंदर पक्षीही दिसतात.

हिरवाई आणि सुंदर फुलांचे एकूणच निसर्गाचे मला न कळत्या वयापासूनच वाटणारे प्रचंड आकर्षण. माझे बालपण सगळे खेड्यात गेलेले.तिथली शांतता. तिथला निसर्ग मध्येच अनेक वर्षे कुठेतरी हरवून गेला होता. कुठल्याही वळणावर भेटला तरी तो आनंद माझ्या मनात नकळत जपला जात असे.माहेरी परसात भरभरून उमललेली फुले, पारिजातक मोगरा, गुलाब इत्यादी फुलांचा सुगंध. जास्वंदी, कोरांटी,चाफा, शेवंती, अबोली अशा अनेक फुलांच्या रंग गंधांत बहरलेला श्रावण मध्येच कुठेतरी दूर गेला होता. या फुलांच्या बरोबरच मला माहित असलेली आणि भारतात सहज लागू होणाऱ्या फुल मालेवर मी मध्यंतरी लिहीत होते.

त्यातील काही फुलांबद्दल मी फक्त वाचले होते आणि फोटो पाहिला होता तीच फुले अचानक भरभरून माझ्यासमोर उमललेली पाहताच मन अगदी आनंदात न्हाऊन गेले. पायतळीची हिरवी मखमल. आणि वेगळे रूप घेऊन आलेला पण तोच तसाच सुंदर निसर्ग. तीच शांतता माझ्या भेटीला अनेक वर्षांनी आल्यासारखे वाटले.

उबदार सुखावणारे ऊन आणि मनमोहक निसर्ग त्यामुळे इथले लोक चार महिन्यात विविध कार्यक्रम ठरवून करत असतात. आणि इथले सरकारही मनोरंजनासाठी जे जे शक्य होईल ते सगळे जनते साठी करते असे लेकीकडून ऐकत आहे. आता ते काय काय असते ते पाहण्याची, अनुभवण्याची आणि शक्य ते शिकण्याची उत्सुकता मनात नक्कीच आहे...

# नात्यां पलीकडचं नातं .. शेजारी ''अस्सा शेजार सुरेख बाई''

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

कोणाच्याही दाराला तेंव्हा कुलूप लावायची पद्धतच नव्हती. दरवाज्याला फक्त कडी लावून फुलाचा पुडा आणि भाजी घेऊन येते आणि येताना दत्त, मारुतीचे दर्शन घेऊन येते.. असे समोर असलेल्याना सांगून जायचे. कुलूप फक्त

गावाला जायचे तेंव्हाच लागायचे आणि त्याची किल्ली सुद्धा कुलकर्णी काकूंच्या खिळ्याला

अडकवून जायचे. कुलकर्णी नाना एकदम साधे,सरळ तर काकूंना तर मी आईच म्हणायचे

त्याही खूप सोज्वळ, नऊवारी लुगडे चोपुन नेसलेले,घट्ट अंबाडा, लालचुटूक ठसठशीत कुंकू पाटल्या, बांगड्या खूपच सुरेख आणि प्रेमळ होत्या. मी तर माझ्या आईला मामा अन मावशा म्हणायचे म्हणून ताई म्हणायचे आणि त्यांना आई म्हणायचे. माझे खूप कौतुक होते त्यांना.कायम त्यांच्याकडेच असायचे मी. त्यांच्या शेजारी बडवे राहायचे.त्यावेळी मुलांच्या नावाने आयांची ओळख असायची.संजूच्या आई, लताच्याआई, मंजुच्याआई,.. बडवे, कुंभारे, आणि आप्पाच्याआई अशी सर्व बिऱ्हाडे होती.

आप्पाच्या आई म्हणजे घरमालकांच्या जवळची नातेवाईक ! त्यामुळे त्या खूप भाव खायच्या. सर्वांत जास्त मिसळत नसत आणि पाणीआले की आधी त्यांनी पाणी भरायचे आणि मग सर्वांना मिळायचे.भयंकर भांडकुदळ, स्वभाव

होता.नवरा नव्हता, मुलेही कोणात मिसळत नव्हती. ते एकटेच वरच्या मजल्यावर रहात होते. बाकी सर्व मात्र एक कुटुंबच होते जणू .

तसे शेजारी, एकी आता पहायला मिळणेपण अशक्यच् !

मी शेजार्यांच्या बाबतीत मात्र खरंच खूप नशीबवान आहे बरकां ! लग्नानंतर यजमानांच्या बदलीच्या नोकरीमुळे अनेक ठिकाणी फिरलो. अगदी मराठवाड्यातील पारगाव सारख्या खेड्यात सुद्धा खूप शेजारीअगदी जीवाला जीव

देणारे भेटले तर दिल्ली, ते मुंबई, पुणे, इंदोर, सोलापूर, औरंगाबाद,अशा अनेक ठिकाणी अनेक आठवणीत साठवण्यासारखे शेजारी लाभले. वेगवेगळ्या धर्मातील ,भाषेतील शेजारी सुद्धा खूप जवळचे झाले. सोलपुरातील मुल्ला, हिंगोली मधील मानकोसकर, जोशी, देशपांडे तर पारगावातील डुंगरवाल, कुलकर्णी यांनी तरी तीस ..बत्तीस वर्षे झालीतरी अजूनही तितकेच प्रेमाचे संबंध जपले आहेत.कारण शेजार्यांचे नाते हे खरोखर वेगळेच असते. तिच गोष्ट अगदी इंदोरला यांची शेवटची पोस्टिंग होती तेंव्हापर्यंतच्या अनेक शेजार्यांच्या बाबतीत आहे

अगदी पाचोऱ्यातील न्याती, शर्मा, असोत किंवा इंदोरचे शेजारी फाटक, नातू, वझलवार..किती म्हणून नावे घेऊ?

आता पुण्यात स्थायिक होऊन काळानुरूप फ्लॅट घेतला.बावीसवर्ष झाली. खरेतर फ्लॅट संस्कृतीमध्ये बऱ्याच ठिकाणी शेजारी कोण राहते, याचीसुद्धा बरेचदा कल्पना नसते. सर्व जातीधर्माचे लोक एकाच इमारतीत रहात असल्याने सण,उत्सव वेगवेगळे असतात. त्यात

सर्वांचेच आयुष्य इतके धावपळीचे झाले आहे की दुसऱ्या कोणाकडे लक्ष द्यायला वेळच नसतो. अशावेळीसुद्धा सांगायला आनंद आणि

अभिमान वाटतो की आमची सोसायटी त्यातही आमची बिल्डींग मात्र याला अपवाद आहे.

वाड्यातल्या इतके जरी नसले तरी आमच्या मजल्यावरील आम्ही, माळवे, धनेश्वर, कोडलेकर ही चार कुटुंब म्हणजे विभक्त असूनही एकत्र कुटुंबातील असल्याप्रमाणेच इतकी वर्ष आनंदात, एकीने राहतो. प्रत्येकांच्या घरातील छोटीमोठी सुखदुःखसुद्धा आम्ही एकमेकांना सांगतो. सकाळी उठल्याबरोबर आम्ही चौघीजणी दरवाजात भेटीसाठी रांगोळी काढण्याच्या निमित्ताने येतो. एरव्ही अगदी झटपट गुडमॉर्निंग करून छोटीशी रांगोळी काढून फक्त महत्वाचे काही खास असेल तर बोलतो,पण सुट्टीच्या दिवशी मात्र आरामात निवांत मनसोक्त हसतखिदळत आमचा रांगोळी तास असतो. कधीकधी तर आमच्या गप्पांचा आवाज ऐकून मग खालच्या मजल्यावरच्या पुंडे, जगताप, ढमढेरे, कुकडे, गोकुळकर, नेने... शेजारी मैत्रिणी सुद्धा वरती येऊन सर्वजणी आम्हाला सामील होतात. तेंव्हाच जर कामवाली, झाडुवाली आली तर ती सुद्धा आमच्या या कट्ट्यावर सामील होतात .मग तर भानच नसते कोणाला.

कोणाच्या तरी घरातून जेंव्हा हाक ऐकू येते, तेंव्हाच नाईलाजाने आटोपते घ्यावे लागते.

सर्वांचे सर्व नातेवाईक आम्हाला माहिती आहेत

आणि ते सगळेही आम्हाला छान ओळखतात. कोणाच्याही घरचे कार्य असले की स्वतःच्याच घरचे समजून तसे पार पडतो. नवरात्रातील अष्टमीचाउपवास वगैरे तरआम्ही एकत्र करतोच पण एरवी सुद्धा कधीआम्ही दुपारी आपापली ताटे घेऊन एकत्र अंगतपंगत करतो. आमरस पार्टी, कधी दालबाटी पार्टी तर कधी भरीत भाकरी पार्टी, धुंदुरमास, आवळीभोजन.. अशा पार्टीचे निमित्त शोधत असतो एकत्र वेळ छान घालवण्यासाठी. नवरात्रातील अष्टमीच्या फुलोऱ्याच्या कडकण्या, गणेशजयंतीचे मोदक वगैरे तर कित्येक वर्षे आम्ही एकत्रच सगळ्या मिळून करतो. दिवाळी गौरी, गणपती उत्सवात तर विचारायलाच नको.फराळाचे पदार्थ एकेकीचे ठरवून करतो. ओळीने एकेकीच्या घरातील गौरी आणायच्या, साड्या नेसवून बसवायच्या,नैवेद्य, आरती करायची मग जेवणे निवांतपणे करायची हा कित्येक वर्षांचा नेम आता ठरलेलाच आहे.आता सुना, जावई आले तरी हे मात्र सुरूच ठेवले आहे. सुना,जावई पण इतके मिसळून गेले आहेत आमच्यात की ते सुद्धा आम्हाला सपोर्ट करतात. अगदी मुलांच्या लग्नात सुद्धा एखादेवेळी सख्खे नातलगसुद्धाकरणार नाहीत



सौ. स्नेहा मुसरीफ,
पुणे

करणार नाहीत इतकी मदत होते.एकदा माझ्या सासूबाईना अचानकच छातीत कळ आली, मला काही सुचेना काय करावे, फक्त एक हाक दिली शेजारी वहिनींना ,लग्गेच सारे धावून आले, अगदी अब्युलन्स बोलावण्यापासून ते हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करून उपचार सुरु होईपर्यंत सर्वांनी इतकी धावपळ केली. नणंद, दीर वगैरे सर्व नातेवाईकसुद्धा नंतरआले. साहजिकच होते कारण ते लांबच रहात होते. सांगायचा मुद्दा हा, की कोणत्याही प्रसंगात अगदी जवळच्या नातलगांपेक्षाही शेजारी जास्त जवळचे, हक्काचे असतात. सर्वांच्या आधी ते हाकेला धावून येतात.आमचे फ्लॅट इतके जवळ जवळ आहेत की एकीच्या घरात दूध गॅसवर चुकून कधी राहिले, उतू चालले तरी दुसऱ्यांच्या घरात त्याचा वास येतो .मग रोजच्या भाजीच्या फोडणीचा तडका शेजारी गेला तरी लग्गेच त्यावरून समजते आज काय शिजतेय ते!अर्थात याचे दोन्ही परिणाम होतात, करपले तर आधी शेजारी विचारतात,गॅसवर काही ठेवले आहे का म्हणून, आणि कधी वा ! आज वांग्याची भाजी केलेली दिसतेय ? म्हणत प्रसादाच्या चुरमुऱ्यांची वाटी येते लगेच घरात ! वाड्यात जशा शेजारी किल्ल्या निर्धास्तपणे ठेवायचे, तशाच सर्वांच्या एकमेकांच्या घरात आहेत.कामवाल्या मावशी सुद्धा खूप वर्षांच्या आणि विश्वासू असल्याने कोणी घरात नसले तरी शेजारून किल्ली घेऊन काम करून जातात. कधी कधी गंम्मत ही होते बरकां,

माझी पुतणी आणि भाची जवळच हॉस्टेलमध्ये शिक्षणासाठी राहायच्या. सुट्टीला कधी कधी घरी येत असत. एकदा दुपारी पुढचे लेक्चर्स ऑफ होते म्हणून त्या दोघी घरी आल्या, खूप भूक लागली होती दोघीनाही. आम्ही त्यादिवशी सर्व स्वयंपाक वगैरे आटोपून यांना सुट्टी असल्याने शॉपिंगसाठी बाहेर गेलो होतो.शेजारी सुद्धा हे माहिती होतेच त्यामुळे त्यांनीही त्यांना किल्ली दिली, समोर टेबलवर जेवण पाहून त्यांनी मनसोक्त ताव मारला.थोडावेळ बसून टीव्ही पाहून त्या पुढच्या लेक्चर्स साठी लॉक करून किल्ली शेजारी देऊन निघून गेल्या. आम्ही निवांतपणे मनसोक्त शॉपिंग करून आलो. स्वयंपाक करून ठेवला असल्यामुळे आम्ही बाहेर काहीही खाल्ले नव्हते त्यामुळे आता भूक पण कडकून लागलेली होती.आमच्या जवळील दुसरी चावी होती त्याने दरवाजा उघडून, हात पाय धुवून ताट पाणी घेऊन वाढायला घेतले आणि धक्काच बसला. पोळ्या जवळ जवळ संपलेल्या, भाजी, आमटी तळाशी गेलेली, भात तर गायबच होता, फ्रीझ मध्ये ठेवलेले श्रीखंडपण डब्याच्या बुडात थोडेसे दिसत होते.काय झाले समजेना.मग झटपट तिखट मिठाची धिरडी केली. शेंगदाण्याच्या चटणी आणि सॉस, लोणच्या सोबत खाल्ले. ती वेळ भागली.थोड्याच वेळात शेजारच्या वहिनींनी भाची आणि पुतणी येऊन गेल्याचे सांगितले आणि मग लब्बाड लांडगे कोण होते ते समजले आणि त्यांनी मनसोक्त ताव मारल्याचे समजतांच आमचेच पोट भरले समाधानाने.

दुसरे दिवशी पुतणीचा फोन आला, काकू, भाजी काय मस्त झाली होती काल... आम्हा दोघांची हसुन हसुन पुरेवाट झाली. तर सांगायचे हे, की अशी कधीकधी गंम्मतपण होते.

शेजारी आणि उसने यांचा संबंध तर कौटुंबिक

चित्रपट, नाटकातून तर नेहमीच दाखवला जातो पूर्वी तर उसने हा प्रकार सर्रास चालायचा. लग्गेच देतो बरका असे म्हणून ते विसरून जाणारे पण भरपूर असायचे. आता बहुतेक मुलांना तरी हा शब्द माहितीसुद्धा नसेल, पण आम्ही अजूनही शेजारधर्मातील हा महत्वाचा हक्क तेवढ्याच हक्काने पाळतो.नवीन काही पदार्थ केला की शेजारी सर्वांकडे दिल्याशिवाय आम्हाला मजाच येत नाही. एखादी छोटीशी वस्तू म्हणजे अगदी ड्रेस, साडी किंवा काहीही नवीन खरेदी केली की कधीशेजारच्या सख्यांना दाखवतो असे होते. शेजारी हा आपल्या जीवनातील इतका अविभाज्य घटक आहे हे अगदी पूर्वी पासूनच सर्वांना ठाऊक आहे. त्यामुळेच तर अगदी छोट्या मुलांना सुद्धा, ''शेजी बाईचा कोंबडा आला माझ्या दारी,घालेन दाणा,पाजीन पाणी'' अशी बालगीते म्हणत शेजाऱ्यांना मदत करावी याचे बाळकडूच देत असतात. एकुणच शेजाऱ्यांच्या बाबतीत आम्ही खूपच भाग्यवान आहोत हेच खरे.म्हणूनच म्हणते ''अस्साशेजार सुरेखबाई,सर्वांना लाभावा''

''अस्सा शेजार सुरेख बाई , जपूनी ठेवावा ...''

****

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559